करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४५ | पाने-८ | दि.२२/११/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.




# करमाळा विधानसभा - नारायण पाटील १७७१०९ विक्रमी मतांनी विजयी

करमाळा : करमाळा विधानसभा मतदार संघात झालेल्या तिरंगी लढतीत राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार व माजी आमदार नारायण (आबा) पाटील हे विक्रमी मतदान म्हणजे ९५११९ मते मिळवून विजयी झाले आहेत. त्यांनी अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे (मते ७८०१०) यांचा १७१०९ मतांनी पराभव केला आहे. शिवसेनेचे (शिंदे गट) उमेदवार दिग्विजय बागल हे तिसऱ्या स्थानावर गेले असून त्यांना ४०८३४ मते मिळाली आहेत. अपक्ष उमेदवार प्रा.रामदास झोळ यांना ४७२२ एवढी मते मिळाली आहेत.



- **एकूण मतदान : ३,२८,९९४** ● **झालेले मतदान : २,२९, ३७५**
- नारायण पाटील यांना झालेले मतदान : ९४,१३४ + ९८५(पोस्टल मतदान) = ९५,११९
- संजयमामा शिंदे यांना झालेले मतदान : ७७३७० + ६४० (पोस्टल मतदान) = ७८,०१०
- दिग्विजय बागल यांना झालेले मतदान : ४०५९१ + २४३(पोस्टल मतदान) = ४०८३४
- प्रा.रामदास झोळ यांना झालेले मतदान : ४६९४ + २८ (पोस्टल मतदान) = ४७२२
- संजय वामन शिंदे - १४९८ ● अशोक वाघमोडे - ४२१ ● ॲड.जमीर शेख - २१२
- जालींदर कांबळे -२१६ ● धिरज कोळेकर -१२९ ● गणेश भानवसे - ८१
- मधुकर मिसाळ - १३० ● सिध्दांत वाघमारे - ५७४ ● विनोद दिलीप सितापुरे - ६६५
- संजय लिंबराज शिंदे - ६१५ ● नोटा-९९५, पोस्टल बाद-४३

करमाळा तालुक्यात १७ व्या फेरी पर्यंत श्री.पाटील यांना ७३०७८ मतदान झाले होते. तर संजयमामा शिंदे यांना ३९८१९ मते मिळाली. श्री.पाटील यांना एकूण ३३२५९ मताचे जे लिड मिळाले ते लिड श्री.शिंदे तोडू शकले नाहीत. याउलट माढा तालुक्यातही पाटील यांना २१०५६ इतके मतदान झाले. संजयमामा यांना ३७५५१ मतदान झाले तर बागल यांना ६३७८ मतदान झाले. यावेळी बागल जास्त मते घेऊ शकले नाहीत. किंबहुना मतदारांनी मतविभागणी टाळली. त्याचा फायदा पाटील यांना झाला. पहिल्या फेरी पासूनच पाटील आघाडीवर होते. (पान ३)



योग्य नियोजन केल्यानंतर कठीण परिस्थितीतही यश मिळते.!

## संपादकीय...........................................!

# करमाळेकरांची साथ तर ३६ गावांचे पाठबळ

करमाळा विधानसभा मतदारसंघातील निवडणुक खुपच गाजली. याचे कारण या निवडणुकीत १५ उमेदवार उभे असलेतरी खरी लढत शेवटी दुरंगी झाली. मतमोजणीत तसेच चित्र शेवटपर्यंत राहिले. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे पुन्हा विजयी होणार की राष्ट्रवादीचे उमेदवार माजी आमदार नारायण आबा पाटील विजयी होणार ; याकडे संपुर्ण करमाळा मतदार संघाचे लक्ष लागले होते. प्रचारात शिवसेनेचे दिग्विजय बागल, अपक्ष प्रा.रामदास झोळ, आमदार संजयमामा शिंदे व नारायण आबा पाटील या सर्वांनी आघाडी घेतली होती. दस्तूरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शरद पवार, जयंत पाटील, नितीन गडकरी, खा.अमोल कोल्हे त्याचबरोबर जयवंतराव जगताप आणि दशरथराव कांबळे यांच्या गाजलेल्या सभा यामुळे कोण जिंकणार ? हा सर्वांच्या समोर प्रश्न होता. खरी भिती करमाळेकरांना माढा तालुक्यातील ३६ गावातील मतांची होती. मागील सन २०१९ च्या मतमोजणीमध्ये सुरुवातीपासून तिसऱ्या क्रमांकावर असणारे उमेदवार संजयमामा शिंदे चक्क विजयी झाले होते. हे संजयमामा त्यावेळी १७ व्या फेरीपर्यंत नारायण आबापेक्षा करमाळा तालुक्यातून २४४५२ मतांनी मागे होते. त्यानंतर माढा तालुक्यातील ३६ गावाच्या जोरावर त्यांनी आपल्यावरील लीड तर तोडलेच पण ५४९० मताचे मताधिक्य मिळवत चक्क विजयश्री मिळवली होती. त्यामुळे या निवडणुकीत नेमके काय होणार ..? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.


एक तर नारायण पाटील यांची लढत ही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून झाली. ते एका सर्वसामान्य परिवारातील प्रतिनिधी आहेत. कर्मयोगी गोविंदबापू पाटील हे अत्यंत सरळमार्गी व्यक्तीमत्व. आदिनाथ कारखाना उभा रहावा यासाठी त्यांनी निष्ठेने केलेले प्रयत्न, एवढेच नाहीतर आदिनाथची साखर बाहेर नियत नाही तोपर्यंत पायात चप्पल घालणार नाही.. अशी प्रतिज्ञा केली व ती सार्थ ठरवली. अशा गोविंदबापूचे वारसदार नारायण आबा आहेत. ना आर्थिक पाठबळ, ना राजकिय पाठबळ, ना शिक्षणाचे पाठबळ,पण या माणसाकडे एक्त एकच जमेची बाजू म्हणजे जिद्द आणि सतत प्रयत्न. एक चांगला पैलवान अशी ओळख निर्माण केली. त्यातून मित्र परिवार जोडला त्यांचे संघटन केले. त्यातून अन्यायाविरूध्द जेऊर भागात लढा सुरू केला. त्यात यश आले आणि तेथूनच त्यांचा राजकिय प्रवास सुरू झाला. जेऊर ग्रामपंचायतीचे सरपंच ते आमदार हा थक्क करणारा प्रवास त्यांनी अनंत अडचणीतून साध्य केला. आमदार झाल्यानंतर नारायण आबा यांची मस्ती वाढेल, त्यांचे कार्यकर्ते सर्वसामान्यांना रस्त्यावर फिरू देणार नाहीत, त्यामुळे त्यांना आहे तिथेच राहु द्या अशा प्रकारची विरोधकांची टिका होती. पण सन २०१४ ला आमदार झाल्यानंतर नारायण आबांनी ही टिका मोडीत काढली. किरकोळ अपवाद वगळता त्यांनी अथवा त्यांच्या समर्थकांनी कोठेही अतताईपणा केला नाही किंवा गुंडगीरी केल्याचे प्रकार उघड झाले नाही. याउलट त्यांनी आमदाराकीच्या काळात राजकारण न पाहता जो कोणी येईल त्याला मदतीचा हात दिला. तालुक्याचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी त्यांनी खुप मेहनत घेतली. त्यामध्ये कोर्टी ते कोंढारचिंचोली रस्ता, जातेगाव ते टेंभुर्णी रस्ता, पोमलवाडी पुल, केत्तूरचा पुल आणि इतर अनेक रस्ते केवळ मंजुर केले नाहीतर ते पुर्ण केले. सर्वात महत्वाचे म्हणजे दहीगाव उपसा सिंचन योजना त्यांनी पुर्ण केली व ती कार्यान्वीत केली. या योजनेचे पाणी भर दुष्काळात शेतकऱ्यांना दिले. त्याप्रमाणे त्यांनी निवडणुकीच्या अगोदर स्वखार्चाने उजनीचे पाणी वडशिवणे तलावात सोडण्याचा घेतलेला निर्णय आणि त्याची केलेली अमंलबजावणी, वीट तलावात याचप्रकारे उजनीचे सोडलेले पाणी असे महत्वाचे निर्णय घेतल्याने ते जनमाणसात लोकप्रिय झाले. याच जोरावर ते सन २०१९ च्या निवडणुकीला उभे होते पण त्यांना त्यावेळी ३६ गावांनी धोका दिला. त्यानंतरही ते थांबले नाही जनसंपर्क ठेवत, सर्वसामान्यांची कामे करत गेले. तालुक्यातील फार मोठ्या पुढाऱ्याच्या नादी न लागता, सर्वसामान्य परिवारातील कार्यकर्ते जवळ केले, त्यांना पाठबळ दिले. जिल्हा परिषद सदस्या सवितादेवी राजेभोसले, माजी सभापती शेखर गाडे, माजी उपसभापती गहिनीनाथ ननवरे, दत्ता सरडे तसेच अजितदादा तळेकर, बिभिषण आवटे, नवनाथ झोळ, महेंद्र पाटील, राजाभाऊ कदम, संदिप मारकड अशा कार्यकर्त्यांच्या जोरावर व मोहिते-पाटील यांच्या साथीने त्यांनी तालुक्यात निष्ठेने काम केले. एवढेच नाहीतर लोकसभा निवडणुकीच्यावेळी त्यांनी मोहिते-पाटील यांच्या बरोबर शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश करून, विधानसभेची उमेदवारी निश्चत केली होती. अन्य उमेदवारा अगोदर त्यांनी प्रचारात आघाडी मिळवली होती. एवढेच नव्हेतर योग्य वेळी त्यांना माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे व करमाळा शहरातील सावंत गटाचे पाठबळ मिळाले. त्यामुळे या निवडणुकीत त्यांनी सुरवातीपासूनच आघाडी घेतली होती. मतमोजणीत त्याचेच प्रत्यंतर आले. पहिल्या फेरीपासून ते १७ व्या फेरी पर्यंत आघाडीवर राहिले व यशस्वी झाले.

यापुढे त्यांना हीच कामाची झेप ठेवावी लागणार आहे. या मतदार संघातील अनेक प्रश्न आहेत. उच्च व तंत्रज्ञान शिक्षण, आरोग्य सेवा, एम.आय.डी.सी. कार्यान्वीत करणे, वीजेचे प्रश्न आहेत. शेतीचे प्रश्न, पुर्नवसनाचे प्रश्न, प्रत्येक गावातील स्थानिक प्रश्न वेगवेगळे आहेत. या कामावर लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे. सत्ता नसताना काम केले आहे. आता सत्ता आली आहे. त्यातून कागदावर नव्हेतर प्रत्यक्ष जनमाणसात आपण करू शकतो हे दाखवून देण्याची संधी नारायण आबांना आली आहे. त्या संधीचं सोनं करावं अशी अपेक्षा आहे. नारायण आबा पाटील यांचे मनापासून अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा...!

# बसमधून २ लाख ३० हजारचे दागिणे चोरीला

करमाळा(सं.प्र.० : बस मधून पर्स मधील सोन्याचे दागिणे असलेले पाकीट चोरट्यांनी चोरून नेऊन त्यातील २ लाख ३० हजार रूपयांच्या दागिण्यांची चोरी झाली आहे. हा प्रकार २२ नोव्हेंबरला दुपारी अडीच वाजता करमाळा बसस्थानकात घडला आहे. या प्रकरणी शितल बिभिषण रोडे (रा.आळजापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

त्यात त्यांनी म्हटले आहे, की २२ नोव्हेंबरला सकाळी साडेनऊ वाजता मी पुणे येथून संजय कुंभार यांच्या खाजगी मिनीबस मधून करमाळ्याला आले. त्यानंतर आळजापूरला जाण्यासाठी सव्वादोन वाजता करमाळा बसस्थानकात आले. त्यावेळी अडीच वाजता जामखेडला जाणारी बस निघाली. या बसमध्ये मी चढत असताना चोरट्यांनी माझ्या बस मधील २ लाख ३० हजार रूपयाचे दागिणे, त्यात दोन तोळ्याचे गंठण, नऊ ग्रॅमचे नेकलेस, नऊ ग्रॅमचे झुबेफुले व आठ ग्रॅमची चैन असे सोन्याचे दागिणे चोरून नेले आहेत. या प्रकरणी पोलीसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.



नारायण पाटील यांच्या विजयानंतर दंड थोपटताना माजी आमदार जयवंतराव जगताप, शेजारी आमदार नारायण आबा पाटील

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून...

# करमाळा विधानसभा - नारायण पाटील १७१०९ विक्रमी मतांनी विजयी

ती आघाडी १० व्या फेरपासून गतिमान झाली. १७ व्या फेरी पर्यंत लिड वाढत गेले. १८ व्या फेरी पासून शिंदे यांना लिड मिळत गेले, पण पाहिजे त्या पटीत लिड मिळू न शकल्याने पाटील हे १७१०९ मतांनी विजयी झाले. निवडणुकीचा निकाल झाल्यानंतर माजी आमदार जयवंतराव जगताप, सावंत बंधु, वीटचे राजेंद्रसिंह राजेभोसले, कंदरचे भास्कर भांगे, राष्ट्रवादीचे संतोष वारे यांच्यासह जगताप समर्थक व पाटील समर्थक यांनी मोठा आनंदोत्सव साजरा केला. शहरातील सर्व महापुरूषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण केले. काहींनी फटाके उडवून, गुलाल उधळून तर काहींनी पेढे वाटून आनंद साजरा केला.

# करमाळ्यासह मोठ्या गावात पाटील यांना लीड

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरात यावेळी नारायण आबा पाटील यांना ३८२७ मतांची आघाडी मिळाली आहे. सन २०१९ मध्ये संजयमामा शिंदे यांना २१२६ मताची आघाडी मिळाली होती. सन २०१९ मध्ये संजयमामा यांना ५१४९ मते तर नारायण पाटील यांना ३०२३ मते मिळाली होती. २०२४ मध्ये नारायण पाटील यांना ६५७४ तर संजयमामा शिंदे यांना २७४७ मते मिळाली आहेत.

केम येथे नारायण पाटील यांना २८०५ तर संजयमामा यांना १००० म्हणजे येथे १८०५ मताचे लीड पडले आहे. वांगी येथे पाटील यांना २७७६ तर संजयमामा यांना ११९० येथे १५८६ मताचे लीड पडलेले आहे. जेऊर येथे पाटील यांना २५१६ तर संजयमामा यांना ५३२ येथे १९८४ मताचे लीड मिळालेले आहे. वरकुटे येथे पाटील यांना ९४० तर संजयमामा यांना २१६ येथे ७२४ मताचे लीड पडलेले आहे. आवाटी येथे पाटील ८२१ तर संजयमामा यांना २८५ येथे ५३६ मताचे लीड पडलेले आहे. उमरड येथे पाटील यांना १२२२ तर संजयमामा यांना ७०० मते मिळाले असून येथे ५२२ मताचे लीड मिळाले आहे. शेलगाव वांगी येथे पाटील यांना १४५९ तर संजयमामा यांना ३१६ येथे ११४३ मताचे लीड मिळालेले आहे. निंभोरे येथे पाटील यांना १२५७ तर संजयमामा यांना ३८४ येथे ८७३ मताचे लीड मिळालेले आहे. साडे येथे पाटील यांना ११७८ तर संजयमामा यांना ६८३ मते मिळाले असून येथे पाटील यांना ४९५ मताचे लीड मिळाले आहे. मिरगव्हाण येथे पाटील यांना ७२५ तर संजयमामा यांना ११० मते मिळाले असून येथे पाटील यांना ६१५ मताचे लीड मिळालेले आहे. लव्हे येथे पाटील यांना ८१६ तर संजयमामा यांना १३० मते मिळालेली आहेत. येथे ६८६ मताचे लीड मिळाले आहे. टाकळी येथे पाटील यांना ९५६ तर संजयमामा यांना२६२ मते मिळाले आहेत. येथे ६९४ मताचे लीड पाटील यांना मिळाले आहे. केतूर येथे पाटील यांना १४८६ तर संजयमामा यांना ४९७ मते मिळाले येथे पाटील यांना ९८९ चे लीड मिळाले आहे. अशाप्रकारे तालुक्यातील मोठ्या गावातून पाटील यांना लीड मिळाल्यामुळे निवडणुकीतील विजय सुखकर झाला आहे.

एवढेच नव्हेतर ३६ गावामध्येही सन २०१९ च्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत पाटील यांनी चांगले मतदान घेतले आहे. २०१९ मध्ये कुर्डु येथे पाटील यांना १२५० मतदान झाले होते. यावेळी १६२२ असे मतदान झाले आहे. कुर्डूवाडी येथे २०१९ ला १६३० मतदान झाले होते. यावेळी ४२९३ मतदान झाले आहे. म्हैसगाव येथे २०१९ ला ३९७ मतदान झाले होते, तर यावेळी १०७६ मतदान झाले आहे. पिंपळखुंटे येथे संजयमामा पेक्षा २६ मते जास्त मिळवली आहेत. येथे आबांना ७२३ तर संजयमामा यांना ६९७ मते मिळाली आहेत. बिटरगाव येथे पाटील यांना ४७१ तर संजयमामा यांना १९० मते मिळाली आहेत. येथे पाटील यांनी २८१ मताचे लीड मिळवले आहे. रोपळे येथे यावेळी ११२८ मते मिळवली आहेत. अशाप्रकारे ३६ गावातून पाटील यांना मिळालेले लीड हे त्यांना मोठ्या प्रमाणात यश देऊन गेले आहे.


विघ्नहर्ता इंटिरीयर

प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम

देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर

• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका



प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर



आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

• नेपाळ दर्शन (रेल्वे प्रवास ३ एसी) — वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा

• काशी दर्शन — काशी, गया, आयोध्या, प्रयाग

• गुजरात दर्शन — गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेचु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
सहल खर्च : रू.१४,०००

• कन्याकुमारी दर्शन — कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

• गंगासागर दर्शन — गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

• केरळ दर्शन (रेल्वे प्रवास ३ एसी) — कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
सहल खर्च : रू.३१,५००

• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन — माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
सहल खर्च रू.२६,०००

• वैष्णोदेवी दर्शन — माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

• मथुरा दर्शन — मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
सहल खर्च : रू.९,१००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय





संपर्क श्री.मयुर राऊत

बुकींग सुरू

मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८


27 नोव्हेंबर
गुरूगणेश गोपालन संस्थेचे संस्थापक
उद्योजक व सामाजिक कार्यात अग्रेसर
असलेले समाजसेवक
मा.श्री.
श्रेणिकशेठ खाटेर
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
माजी नगरसेविका
सौ.संगीता श्रेणिक खाटेर
शुभेच्छुक
विजय अशोक बरीदे, करमाळा.


सामाजिक कार्यकर्ते
श्रेणिकशेठ खाटेर
यांना दि.२७ नोव्हेंबर रोजी
असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
संतोष भांड
करमाळा, जि.सोलापूर


भावपूर्ण श्रध्दांजली
कै.कोमल दशरथ पांडे
(मृत्यू दि.५/११/२०२४)
सहवास जरी संपला तरी,
तुझा सुगंध दरवळत राहील ।
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
तुझी आठवण नेहमीच येत राहील ।।
तुझ्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
शोकाकुल
पांडे परिवार, वांगी नं.१


जाहीर आभार
२४४, करमाळा विधानसभा मतदारसंघातील मतदार राजा, सर्वसामान्य जनता, युवकमित्र, लाडक्या बहिणी या सर्वांनी मला आपला मतरूपी आशिर्वाद दिला. मतदारांनी दिलेला कौल मान्य करत असून, यशाचे हुलकावणी दिली असलीतरी आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर राहून सर्वसामान्यांच्या ऋणात राहणेच, मला आवडेल. भविष्यातही असेच सर्वांचे सहकार्य व आशिर्वाद राहील हीच खात्री..!
आपला ऋणी
दिग्विजय दिगंबरराव बागल


आशिर्वाद
खंबीर साथ
खासदार
शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ व
श्री भैरवनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष
प्राचार्य जयप्रकाश बिले
आपणांस ७५ व्या वाढदिवसास हार्दिक
शुभेच्छा ! तसेच करमाळा-माढा
विधानसभा निवडणुकीत
मा.श्री.नारायण आबा पाटील
हे विक्रमी मतांनी विजयी झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
27 Novembar
शुभेच्छुक
● जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल, झरे
● जयप्रकाश बिले ज्युनिअर कॉलेज, झरे
● डॉ.पी.डी.पाटील बी.सी.ए. कॉलेज, झरे


युवक नेते
मा.सभापती, पं.स.
लोकनियुक्त सरपंच
करमाळा-माढा विधानसभा निवडणुकीत
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
प्रचंड मताधिक्क्याने विजयी झाल्याबद्दल..
शुभेच्छुक
हार्दिक अभिनंदन !
कर्मयोगी गोविंदबापू पाटील ग्रा. बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या; जेऊर
चेअरमन : संजय मोतीलाल गादीया, व्हा.चेअरमन : मुबारक अब्दुल शेख, सचिव : अनिल श्रीपती पाटील
संचालक : ऋषीकेश श्रीराम पाटील, सुनील यशवंत शहाणे, शितल शरद दोशी, नवीनचंद नेमचंद दोशी, अर्जुन भिमराव पांढरे, श्रीकृष्ण महादेव कांबळे, सौ.अर्चना विपुल लुणावत, श्रीमती छाया बळीराम गुटाळ व्यवस्थापक : शांताराम विठ्ठल सुतार क्लार्क : सोमनाथ वाघमोडे, शिपाई : कुलदीप जाधव(शिपाई), सर्व सभासद व कर्मचारी वृंद

# करमाळा विधानसभा मतदार संघात उमेदवाराला मिळालेली गावनिहाय मते

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| घरतवाडी | ३६ | १६६ | ५१ | १२ |
| कुंभारगाव | ११९ | २२६ | १८२ | १४ |
| कुंभारगाव | १०६ | २२५ | १७१ | १२ |
| **एकूण** | **२२५** | **४५१** | **३५३** | **२६** |
| सावडी | २०९ | २५२ | २५६ | ३४ |
| सावडी | १७४ | ३५६ | १८५ | ८ |
| सावडी | २६१ | १६५ | १२९ | ८ |
| **एकूण** | **६४४** | **७७३** | **५७०** | **४८** |
| कोर्टी | ३५५ | १६५ | १४३ | ९ |
| कोर्टी | २४५ | २३२ | १४० | ४ |
| कोर्टी | ३१३ | २५२ | १५१ | ६ |
| **एकूण** | **७१३** | **६४९** | **४३४** | **१९** |
| गोरेवाडी | १६६ | १८३ | ६७ | ५ |
| हुलगेवाडी | ५४ | २२८ | ३८ | ० |
| कुस्करवाडी | ८८ | ६२ | ९१ | २ |
| मोरवड | ५५ | ३१४ | २३१ | २१ |
| मोरवड | १४१ | २५८ | १२६ | ४ |
| **एकूण** | **१९६** | **५७२** | **३५७** | **२५** |
| वंजारवाडी | १४८ | १३६ | ७९ | ३ |
| वंजारवाडी | १६३ | १३६ | ८४ | १ |
| **एकूण** | **३११** | **२७२** | **१६३** | **४** |
| रावगाव | ३१४ | २३८ | १९३ | ५ |
| रावगाव | ३७८ | १८१ | २२२ | २९ |
| रावगाव | २५८ | १८७ | ३०४ | ५ |
| **एकूण** | **९५०** | **६०६** | **७१९** | **३९** |
| लिंबेवाडी | १६९ | ७२ | १५९ | ३ |
| पुनवर | ३२९ | २१० | ५४ | १६ |
| पुनवर | २८३ | १९५ | २७ | १४ |
| **एकूण** | **६१२** | **४०५** | **८१** | **३०** |
| जातेगाव | १४४ | ३३८ | १५३ | २१ |
| जातेगाव | १९३ | २७८ | २२६ | १८ |
| **एकूण** | **३३७** | **६१६** | **३७९** | **३९** |
| खडकी | २९४ | १६६ | १७७ | ९ |
| खडकी | १६१ | ३५४ | १३५ | ८ |
| **एकूण** | **४५५** | **५२०** | **३१२** | **१७** |
| आळजापूर | १२९ | २५३ | २०७ | ३२ |
| आळजापूर | १२३ | १४६ | १२५ | ३३ |
| **एकूण** | **२५२** | **३९९** | **३३२** | **६५** |
| कामोणे | २०७ | २९० | ७८ | १७ |
| कामोणे | १७७ | १४४ | ३८ | २० |
| **एकूण** | **३८४** | **४३४** | **११६** | **३७** |
| मांगी | ५३४ | ३९ | १८४ | ५ |
| मांगी | ४०७ | ४१ | ९२ | ३ |
| **एकूण** | **९४१** | **८०** | **२७६** | **८** |
| वडगाव उ | ४९५ | २९६ | १०६ | ७ |
| वडगाव द | १३२ | २०९ | २१७ | ११ |
| **एकूण** | **६२७** | **५०७** | **३२३** | **१८** |
| भोसे | २४५ | २३२ | ११९ | ९ |
| पिंपळवाडी | २७२ | २१३ | १५९ | १५ |
| वीट | ९१ | ३७० | २१९ | ३७ |
| वीट | १२५ | ५७८ | २०८ | २५ |
| वीट | १७५ | ४२४ | २१२ | १५ |
| वीट | १९७ | ३३६ | २०३ | २१ |
| **एकूण** | **५८८** | **१७०८** | **८४२** | **९८** |
| विहाळ | १४५ | २४५ | १०७ | २ |
| विहाळ | १३१ | ३२३ | १०९ | १ |
| **एकूण** | **२७६** | **५६८** | **२१६** | **३** |
| पोंधवडी | १९२ | २१४ | ४२ | १३ |
| पोंधवडी | १४३ | २११ | ३३ | ११ |
| **एकूण** | **३३५** | **४२५** | **७५** | **२४** |
| राजुरी | ८१ | २०९ | ५०२ | १३२ |

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| राजुरी | ४२ | २१७ | २३३ | ५९ |
| राजुरी | ४४ | १९४ | २९३ | ६६ |
| **एकूण** | **१६७** | **६२०** | **१०२८** | **२५७** |
| दिवेगव्हाण | १७२ | २६७ | ११७ | १५० |
| देलवडी | १८० | १७२ | १७२ | ३१ |
| भिलारवाडी | ९१ | २२३ | १६५ | १३ |
| भिलारवाडी | १२५ | १७५ | १७९ | ११ |
| **एकूण** | **२१६** | **३९८** | **३४४** | **२४** |
| कावळवाडी | १३५ | २७९ | २०८ | ३ |
| रामवाडी | २९४ | २११ | १२२ | ४४ |
| जिंती | ८५ | ५१० | २१८ | ५ |
| जिंती | ६१ | २७९ | २३७ | १८ |
| **एकूण** | **१४६** | **७८९** | **४५५** | **२३** |
| भगतवाडी | १३५ | ३५७ | १५६ | ४ |
| गुलमरवाडी | २४ | २४० | ९१ | १७ |
| हिंगणी | १०० | २५४ | ३२७ | ४९ |
| पारेवाडी | १२८ | १६० | ३३२ | ११ |
| पारेवाडी | २३१ | १३६ | १०२ | ७ |
| **एकूण** | **३५९** | **२९६** | **४३४** | **१८** |
| वाशिंबे | १५९ | ३४१ | ३६९ | १०४ |
| वाशिंबे | १४५ | ४०३ | २५५ | १०८ |
| **एकूण** | **१७४** | **७४४** | **६२४** | **२१२** |
| उंदरगाव | १८० | १९२ | १०४ | ७१ |
| रिटेवाडी | ३० | २०० | १२४ | २ |
| मांजरगाव | २३९ | ३२७ | २२९ | ९८ |
| उमरड | ८८ | ३७० | २६० | ८ |
| उमरड | १३२ | ५१८ | १६९ | १० |
| उमरड | १०० | ३३४ | २७१ | १६ |
| **एकूण** | **३२०** | **१२२२** | **७००** | **३४** |
| अंजनडोह | १५१ | ३४० | ९९ | ६ |
| अंजनडोह | १६८ | १९४ | ८९ | २ |
| **एकूण** | **३१९** | **५३४** | **८८** | **८** |
| झरे | ९० | ३२८ | ३६८ | ९ |
| झरे | ५६ | ३९१ | २५३ | १ |
| झरे | ५३ | २९९ | २२१ | ५ |
| **एकूण** | **१९९** | **१०१८** | **८४२** | **१५** |
| देवळाली | ९२ | २८१ | २८० | १२ |
| देवळाली | १२४ | ४१० | २७९ | १५ |
| देवळाली | ४८ | ४६० | ४०२ | १० |
| **एकूण** | **२६४** | **११५१** | **९६१** | **३७** |
| रोशेवाडी | १४९ | २०५ | १४० | ११ |
| हिवरवाडी | ३३६ | २०१ | ३१ | १० |
| करमाळा | २२८ | १८० | १६५ | ९ |
| करमाळा | ७८ | २४० | ३२ | २ |
| करमाळा | ३२५ | ३१८ | ११२ | ६ |
| करमाळा | १३२ | २०८ | ११८ | ३ |
| करमाळा | १३९ | २२१ | ११६ | १४ |
| करमाळा | १९८ | ३०१ | २७० | ८ |
| करमाळा | १७६ | ४०६ | १७८ | ५ |
| करमाळा | २०३ | ४२२ | ११३ | १० |
| करमाळा. | १४३ | १८१ | ९५ | ४ |
| करमाळा | ११२ | १५१ | १०९ | २ |
| करमाळा | ४१२ | २९३ | २०९ | १४ |
| करमाळा | ६० | २९२ | ८७ | ६ |
| करमाळा | १२४ | २०४ | १११ | १४ |
| करमाळा | २०२ | ४३८ | १४८ | ८ |
| करमाळा | १५० | ३५८ | २६१ | १४ |
| करमाळा | ४९ | १२८ | ६५ | १ |
| करमाळा | ११९ | ३२७ | १३५ | १८ |
| करमाळा | ७५ | ४३८ | ७४ | ६ |
| करमाळा | ७६ | ४६२ | ९२ | १० |

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| करमाळा | १३६ | ३४२ | १०३ | १२ |
| करमाळा | १३५ | ४७८ | ३६ | ५ |
| करमाळा | २७२ | १८६ | ११८ | ९ |
| **एकूण** | **३५४४** | **६५७४** | **२७४७** | **१८०** |
| पोथरे | ४८९ | ३०५ | २०५ | ६० |
| पोथरे | ३०३ | ३४७ | ९० | ५३ |
| पोथरे | २३४ | ३९६ | ६७ | २५ |
| **एकूण** | **१०२६** | **१०४८** | **३६२** | **१३८** |
| बिटरगाव श्री | ९० | १४८ | २२५ | २८ |
| तरटगाव | ६३ | १७२ | २०४ | ४० |
| पाडळी | १९८ | ३६७ | २६६ | ९५ |
| घारगाव | १९३ | ४८५ | ११६ | ९४ |
| बाळेवाडी | १७५ | १९३ | १६२ | २५ |
| पोटेगाव | १३२ | २१८ | १०८ | ५९ |
| निलज | ४८ | १९९ | ५३ | ५३ |
| धायखिंडी | ८३ | ४२८ | १७ | ८ |
| खांबेवाडी | ७८ | ६०२ | ११४ | १ |
| श्रीदेवीचामाळ | १४२ | ४१९ | ३६० | ३६ |
| पांडे | २८२ | २८५ | १६२ | ८ |
| पांडे | ३३१ | ३१८ | १२७ | ७ |
| **एकूण** | **६१३** | **६०३** | **२८९** | **१५** |
| गुळसडी | १५४ | ३८६ | २०० | १० |
| गुळसडी | ९७ | ३३१ | २३० | ३ |
| **एकूण** | **२५१** | **७१७** | **४३०** | **१३** |
| खडकेवाडी | १६३ | २४५ | ९४ | २१ |
| कुंभेज | १२८ | ३६१ | २७८ | १७ |
| कुंभेज | ८२ | ३५० | १३२ | १० |
| कुंभेज | ४२ | २०६ | १४४ | १९ |
| **एकूण** | **२५२** | **९१७** | **५५४** | **४६** |
| पोफळज | १२७ | ४१७ | १२१ | ४४ |
| पोफळज | ५२ | ४८७ | १०२ | ७ |
| **एकूण** | **१७९** | **९०४** | **२२३** | **५१** |
| केडगाव | १३० | ३९६ | १३७ | १० |
| केडगाव | ९३ | ४१९ | १४६ | १४ |
| केडगाव | ० | ७ | १२७ | १ |
| **एकूण** | **१२३** | **८२२** | **४१०** | **२५** |
| सोगाव प. | १९९ | २२३ | ५१ | २१ |
| सोगाव प. | १२६ | १६४ | २९२ | १३ |
| **एकूण** | **३२५** | **३८७** | **३४३** | **३४** |
| सोगाव पू | २२५ | १०६ | ११५ | ७७ |
| गोयेगाव | ५४ | ४७५ | १४१ | २१ |
| केत्तूर नं.२ | ६८ | ४१२ | २४ | १ |
| केत्तूर नं.२ | ६९ | ३०५ | २४१ | १० |
| केत्तूर नं.१ | ९३ | ७६९ | २३२ | १९ |
| **एकूण** | **२३०** | **१४८६** | **४९७** | **३०** |
| पोमलवाडी | १३४ | २५४ | २८५ | १२ |
| खातगाव | ९१ | ५४५ | २०७ | ६ |
| टाकळी | ६४ | ५७९ | १०६ | ० |
| टाकळी | १६६ | ३७७ | १५६ | २ |
| **एकूण** | **२३०** | **९५६** | **२६२** | **२** |
| कात्रज | ५२ | ६४९ | २९६ | २ |
| कों.चिंचोली | १०० | ४८० | २०८ | २४ |
| कुगाव | ८६ | २६३ | २०३ | १५ |
| कुगाव | १२६ | २५५ | ९७ | १ |
| **एकूण** | **२१२** | **५१८** | **३००** | **१६** |
| चिखलठाण २ | ७२ | १२७ | २०३ | २४ |
| चिखलठाण | १४० | २९२ | ४६४ | १३ |
| चिखलठाण | २२९ | ३१३ | २७६ | ११ |
| चिखलठाण | ११९ | २९४ | २४३ | ८ |
| **एकूण** | **५६०** | **१०२६** | **११८६** | **५६** |

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| शेटफळ | १६५ | ३०४ | ३०१ | ४ |
| शेटफळ | ३७४ | ११४ | २१७ | ९ |
| **एकूण** | **५३९** | **४१८** | **५१८** | **१३** |
| जेऊरवाडी | ८० | १४७ | ३२७ | ७ |
| जेऊर | ८१ | ५३८ | १३१ | ४ |
| जेऊर | ५० | ४१६ | ५७ | १ |
| जेऊर | ४२ | ४४० | ४८ | ४ |
| जेऊर | ६३ | ५०५ | १३६ | ३ |
| जेऊर | ७९ | ६१७ | १६० | ७ |
| **एकूण** | **३१५** | **२५१६** | **५३२** | **१९** |
| कोंढेज | १३१ | ४१४ | १७५ | ३ |
| कोंढेज | १५३ | ३३७ | २०३ | ० |
| **एकूण** | **२८४** | **७५१** | **३७८** | **३** |
| वरकटणे | २५१ | २४२ | २०१ | ५ |
| वरकटणे | १२२ | १४४ | १५८ | ८ |
| **एकूण** | **३७३** | **३८६** | **३५९** | **१३** |
| सरपडोह | २०३ | २३८ | १३६ | ७३ |
| सौंदे | ६० | ४२९ | ३८७ | ३२ |
| शेलगाव क | ५५ | १७९ | २४२ | १२ |
| शेलगाव क | ११४ | २५७ | २७९ | १० |
| **एकूण** | **१६९** | **४३६** | **५२१** | **२२** |
| हिसरे | ६२ | २८३ | २८६ | २३ |
| हिसरे | १०० | ३०६ | २४१ | १६ |
| **एकूण** | **१६२** | **५८९** | **५२७** | **३९** |
| भालेवाडी | ७६ | ४८६ | १०७ | १७ |
| करंजे | १७४ | १८७ | २०४ | ४६ |
| करंजे | २४१ | १७५ | १८७ | १० |
| **एकूण** | **४१५** | **२०२** | **३९१** | **५६** |
| दिलमेश्वर | ८३ | १२६ | ६० | ३ |
| बोरगाव | १७८ | १६५ | २२९ | १२७ |
| बोरगाव | ७१ | १३४ | १६५ | ४४ |
| **एकूण** | **२४९** | **२९९** | **३९४** | **१७१** |
| वडाचीवाडी | ८१ | ७६ | २०५ | ५२ |
| मिरगव्हाण | ७८ | ३३१ | ४४ | १८ |
| मिरगव्हाण | ७४ | ३९४ | ६६ | ७ |
| **एकूण** | **१५२** | **७२५** | **११०** | **२५** |
| हिवरे | १२४ | २५७ | १४८ | ३१ |
| हिवरे | १०१ | १४७ | १६५ | २ |
| **एकूण** | **२२५** | **४०४** | **३१३** | **३३** |
| अर्जुननगर | ९३ | १७७ | २३८ | १२ |
| अर्जुननगर | १०३ | १८२ | २२५ | ६ |
| **एकूण** | **१९६** | **३५९** | **४६३** | **१८** |
| फिसरे | १२७ | १७३ | १८० | १२ |
| फिसरे | ९७ | १८९ | २०७ | १२ |
| **एकूण** | **२२४** | **३६२** | **३८७** | **२४** |
| साडे | १५७ | २७० | १५९ | २२ |
| साडे | १३५ | ३८७ | १९६ | ८ |
| साडे | १२४ | २४६ | १५४ | ७ |
| साडे | १२१ | २७५ | १७४ | ५ |
| **एकूण** | **५३७** | **११७८** | **६८३** | **४२** |
| निंभोरे | ९७ | ६३५ | २१८ | १५ |
| निंभोरे | १०१ | ६२२ | १६६ | २६ |
| **एकूण** | **–** | **१२५७** | **३८४** | **४१** |
| लव्हे | २५ | ८१६ | १३० | २ |
| शेलगाव वां. | ११९ | ५६७ | ११३ | १४ |
| शेलगाव वां. | १०८ | ४६० | ९२ | ७ |
| शेलगाव वां. | ९२ | ४३२ | १०१ | ६ |
| **एकूण** | **३१९** | **१४५९** | **३१६** | **२७** |
| दहिगाव | ६३ | ७५३ | १२९ | १३ |
| ढोकरी | ७३ | २६१ | २८ | ० |
| वांगी नं.४ | ७१ | २१८ | ६० | ५ |

## माढा तालुक्यातील ३६ गावातून उमेदवारांना मिळालेली गावनिहाय मते

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| भिवरवाडी | २३६ | १४० | १२० | २९ |
| वांगी १ | १६९ | ४०९ | २१६ | १२ |
| वांगी १ | १८३ | ४६६ | १४८ | १५ |
| वांगी ३ | २४८ | ५२१ | १४८ | १४ |
| वांगी ३ | १५७ | ३१७ | १०१ | १ |
| वांगी ३ | १३५ | २५१ | ८१ | ५ |
| वांगी २ | ७२ | ३८८ | २८८ | ९ |
| वांगी २ | १२७ | ४२४ | २०८ | ६ |
| **एकूण** | **१०९१** | **२७७६** | **१११०** | **६२** |
| भाळवणी | २३७ | ५४५ | ५८ | ० |
| पांगरे | २८० | २९८ | १७२ | २ |
| पांगरे | १३० | २३६ | १३६ | १० |
| **एकूण** | **४१०** | **५३४** | **३०८** | **१२** |
| मलवडी | २८ | ५६३ | १४९ | ० |
| मलवडी | ४४ | ३७० | १५२ | १ |
| **एकूण** | **७२** | **९३३** | **३०१** | **१** |
| घोटी | ३५ | ३५० | २९६ | २ |
| घोटी | ७२ | ३५१ | २३४ | २ |
| घोटी | ५२ | २४८ | २०७ | ५ |
| **एकूण** | **१५९** | **९४९** | **७३७** | **९** |
| आळसुंदे | ३३४ | २६६ | ११७ | ५ |
| सालसे | ७९ | ३३९ | ४१६ | २ |
| सालसे | ४७ | ३७३ | ३३० | ३ |
| **एकूण** | **१२६** | **७१२** | **७४६** | **५** |
| गौंडरे | १४१ | ३१३ | २८४ | २ |
| गौंडरे | ६८ | २४९ | २१६ | ३ |
| **एकूण** | **२०९** | **५६२** | **५००** | **५** |
| कोळगाव | २२१ | ३४८ | १७१ | ३ |
| निमगाव ह | ३२२ | २५१ | २९३ | ९ |
| आवाटी | ५० | ५५३ | १०४ | १८ |
| आवाटी | ८० | २६८ | १८१ | १८ |
| **एकूण** | **१३०** | **८२१** | **२८५** | **३६** |
| नेरले | १३९ | ३७६ | २३५ | २४ |
| नेरले | ८३ | ३८३ | २२२ | १९ |
| **एकूण** | **२२२** | **७५९** | **४५७** | **४३** |
| वरकुटे | १३० | ४६४ | १४८ | १७ |
| वरकुटे | १०७ | २५९ | ७६ | १ |
| वरकुटे | ७८ | २१७ | ६९ | ४ |
| **एकूण** | **३१५** | **९४०** | **२१६** | **२२** |
| पाथुर्डी | ६८ | ३८३ | ८४ | ० |
| पाथुर्डी | ६७ | २३४ | १३२ | १ |
| **एकूण** | **१३५** | **६१७** | **२१६** | **१** |
| केम | ९४ | ३११ | १२२ | २७ |
| केम | ७९ | २८० | ७९ | ७ |
| केम | १६६ | ४३५ | ११२ | १४ |
| केम | १९१ | ३५४ | १३५ | २१ |
| केम | १०८ | ३४१ | १८३ | २५ |
| केम | ७५ | २९६ | १०९ | ९ |
| केम | ७८ | २७२ | १३३ | ९ |
| केम | १२४ | ५१६ | १२७ | २० |
| **एकूण** | **९१५** | **२८०५** | **१०००** | **१३२** |
| वडशिवणे | २३१ | ४३२ | १०६ | २७ |
| वडशिवणे | ११५ | २९२ | ८० | १९ |
| **एकूण** | **३४६** | **६२४** | **१८६** | **४६** |
| कविटगाव | १०९ | २५६ | २१७ | १५ |
| कविटगाव | ६९ | २९३ | १६९ | १६ |
| **एकूण** | **१७८** | **५४९** | **३८६** | **३१** |
| सांगवी नं.२ | १०० | २६७ | १५८ | १९ |
| बिटरगाव वां | १७४ | ५०२ | ३२८ | २२ |
| बिटरगाव वां | ३९ | २२१ | १३५ | २० |
| **एकूण** | **२१३** | **७२३** | **४६३** | **४२** |

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| कंदर | २३१ | ४६७ | २०७ | १० |
| कंदर | २०७ | ३५० | २५८ | २१ |
| कंदर | १६७ | ३९६ | २९४ | १९ |
| कंदर | २११ | ३२४ | २६२ | १४ |
| **एकूण** | **८१६** | **१५३७** | **१०११** | **६४** |
| सातोली | ११८ | ३३० | २७२ | ५८ |
| कन्हेरगाव | १९ | १४६ | ४३५ | १ |
| कन्हेरगाव | १२ | १७३ | ३३४ | ० |
| कन्हेरगाव | ४६ | १७१ | ६४३ | १ |
| **एकूण** | **७७** | **४९०** | **१४१२** | **२** |
| दहिवली | २५ | २५८ | ३७९ | ० |
| दहिवली | १९ | २५४ | ५३८ | १ |
| **एकूण** | **४४** | **५१२** | **९१७** | **१** |
| उपळवाटे | ९ | १५१ | ४७६ | ५ |
| उपळवाटे | १३ | १६० | ५१८ | ९ |
| **एकूण** | **२२** | **३११** | **९९४** | **१४** |
| ढवळस | २० | १०३ | ५२६ | ० |
| ढवळस | २७ | २२७ | ४७३ | २ |
| **एकूण** | **४७** | **३३०** | **९९९** | **२** |
| जाखले | २८ | ६८ | १७८ | ० |
| लोणी | ११ | १४९ | ३५४ | ० |
| मुंगशी | २० | १४४ | ३०६ | १ |
| **एकूण** | **३१** | **२९३** | **६६०** | **१** |
| रोपळे | २५ | २०९ | २३१ | १ |
| रोपळे | १३ | १२३ | ४२३ | २ |
| रोपळे | ३२ | २९० | ५०७ | ११ |
| रोपळे | १८ | २३७ | २५२ | ० |
| रोपळे | ३२ | २६९ | २४४ | ३ |
| **एकूण** | **१२०** | **११२८** | **१६५७** | **१७** |
| लोणी | ९५ | १११ | ३०३ | ३ |
| मुंगशी | ४३ | २१८ | ५४७ | १५ |
| नाडी | ४१ | २३० | २५५ | ० |
| शिंगेवाडी | १५ | ३२१ | ६२३ | २ |
| बिटरगाव | ५० | ४७१ | १९० | १३ |
| कव्हे | १०१ | २१८ | ५४२ | ५ |
| कव्हे | ८१ | २०२ | ५६८ | ९ |
| कव्हे | ६८ | २३४ | ४९२ | ६ |
| **एकूण** | **२५०** | **६५४** | **१६०२** | **२०** |
| महादेववाडी | ५८ | २२३ | २४८ | १ |
| चोभेपिंपरी | ४२ | २५२ | ५२६ | ४ |
| चोभेपिंपरी | २२ | २१६ | ४७२ | २ |
| **एकूण** | **६४** | **४६८** | **९९८** | **६** |
| पिंपळखुंटे | ८८ | ३१२ | २५८ | ३ |
| पिंपळखुंटे | ६० | १६२ | २०४ | १ |
| पिंपळखुंटे | ८६ | २४९ | २३५ | १ |
| **एकूण** | **१६४** | **७२३** | **६९७** | **५** |
| बादलेवाडी | १६ | ३६८ | ५१० | ० |
| निमगाव टें | ० | ७ | ५५६ | १ |
| निमगाव टें | ० | ४ | ६९८ | १ |
| निमगाव टें | २ | २१ | १०६९ | ० |
| **एकूण** | **२** | **३२** | **२३२३** | **२** |
| शेडशिंगे | १० | २४६ | ५८७ | १ |
| शेडशिंगे | ९ | ११३ | ५४९ | २ |
| **एकूण** | **१९** | **३५९** | **११३६** | **३** |
| अंबड | ३४ | १६२ | ३४० | ० |
| अंबड | २८ | २११ | ५१२ | ४ |
| **एकूण** | **६२** | **३७३** | **८५२** | **४** |
| कुर्डू | ६८ | ३०८ | २९७ | १ |
| कुर्डू | ५२ | २७२ | ३८४ | १ |
| कुर्डू | ४० | १२८ | १३८ | ० |
| कुर्डू | ९० | ११६ | २४५ | १ |
| कुर्डू | ५२ | २४२ | ३८३ | ० |

| गावाचे नांव | बागल | पाटील | शिंदे | झोळ |
|---|---|---|---|---|
| कुर्डू | ५६ | २०६ | २९८ | ६ |
| कुर्डू | ७६ | १७९ | २८९ | २ |
| कुर्डू | ४७ | १७१ | २६० | २ |
| **एकूण** | **४८१** | **१६२२** | **२२९४** | **१५** |
| कुर्डूवाडी | ९१ | १७५ | २८२ | ४ |
| कुर्डूवाडी | ७७ | २३८ | २५५ | ४ |
| कुर्डूवाडी | ५९ | २५८ | ४१३ | ३ |
| कुर्डूवाडी | ८६ | २०६ | ३१६ | १ |
| कुर्डूवाडी | ६१ | १९४ | ३५९ | ० |
| कुर्डूवाडी | ७७ | २४१ | ३६६ | १ |
| कुर्डूवाडी | ५१ | १७३ | २३८ | २ |
| कुर्डूवाडी | ४४ | २१४ | १६९ | ० |
| कुर्डूवाडी | २६ | २५४ | २९४ | ० |
| कुर्डूवाडी | ७२ | १९५ | २२५ | ९ |
| कुर्डूवाडी | ४४ | १९७ | २६६ | १ |
| कुर्डूवाडी | ४५ | १३७ | १७० | ० |
| कुर्डूवाडी | ८० | १६२ | २०२ | १ |
| कुर्डूवाडी | १२४ | १६५ | २४१ | १ |
| कुर्डूवाडी | ७६ | ९१ | १३५ | १ |
| कुर्डूवाडी | १९ | १०५ | १४८ | ० |
| कुर्डूवाडी | ८२ | १९४ | ३१८ | २ |
| कुर्डूवाडी | ८९ | २५९ | ३७३ | २ |
| कुर्डूवाडी | ११८ | १८८ | ३६९ | २ |
| कुर्डूवाडी | ३८ | १५८ | २३१ | १ |
| कुर्डूवाडी | ४२ | १३७ | २०५ | ३ |
| कुर्डूवाडी | १२२ | १७३ | ३८४ | ० |
| कुर्डूवाडी | ८२ | १८० | २८८ | १ |
| **एकूण** | **१६०५** | **४२९३** | **६२४७** | **३९** |
| गवळेवाडी | ३३ | ९८ | ३४६ | ४ |
| बारलोणी | ४८ | १६८ | २९५ | २ |
| बारलोणी | ९२ | २९० | ४८७ | ४ |
| बारलोणी | ७२ | २१९ | ५०१ | १३ |
| **एकूण** | **२१२** | **६७७** | **१२८३** | **१९** |
| लहू | ४० | १३८ | ४५४ | १ |
| लहू | ४० | १५७ | ४४० | ४ |
| **एकूण** | **८०** | **२९५** | **८९४** | **५** |
| म्हैसगाव | ८२ | २६४ | ४३३ | १३ |
| म्हैसगाव | ९७ | ३५९ | ३३८ | १० |
| म्हैसगाव | १०७ | २५१ | ३७२ | ६ |
| म्हैसगाव | ९१ | २०२ | ३३७ | ५ |
| **एकूण** | **३७७** | **१०७६** | **१४८०** | **३४** |
| चिंचगाव | १०४ | २२३ | ४४६ | १६ |
| चिंचगाव | ७२ | १७९ | २६९ | १२१ |
| **एकूण** | **१७६** | **४०२** | **७१७** | **१३७** |
| अकुलगाव | ९३ | २०३ | ३९० | ७४ |
| अकुलगाव | ९७ | १६८ | ३७६ | ७ |
| **एकूण** | **१९०** | **३७१** | **७६६** | **८१** |
| भोसरे | ८३ | १८२ | ३७४ | ५ |
| भोसरे | ८६ | २८१ | ४२२ | ० |
| भोसरे | ७२ | २३९ | ४४७ | ३ |
| भोसरे | ३३ | १६७ | २८० | ११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भोसरे | ७९ | २३८ | ३५१ | ६ |
| भोसरे | ७५ | १२६ | २५५ | १ |
| भोसरे | ४९ | १४४ | ३४८ | ४ |
| **एकूण** | **४७७** | **१३७७** | **२४७७** | **३०** |
| घाटणे | ३८ | १७७ | ३९१ | ५ |
| घाटणे | २२ | १७० | ४५० | ३ |
| **एकूण** | **६०** | **३४७** | **८४१** | **८** |
| वडाचीवाडी | ५० | १०४ | ४३० | ४ |
| तडवळे | ५९ | १३७ | २७१ | १५ |
| तडवळे | ४५ | ११९ | २५० | २ |
| **एकूण** | **१०४** | **२५६** | **५२१** | **१७** |
| पापणस | ४९ | १४४ | ३४८ | ४ |
| रिधोरे | ५० | १८२ | २८७ | ६५ |
| रिधोरे | ६३ | १४३ | २७४ | ५० |
| **एकूण** | **११३** | **३२५** | **५६१** | **११५** |
| तांदुळवाडी | २२ | २१५ | ३७३ | ४१ |
| तांदुळवाडी | २७ | २४७ | २४१ | २२ |
| **एकूण** | **४९** | **४६२** | **६१४** | **६३** |
| शिंदेवाडी | २३ | १४६ | ४९५ | २ |
| सापटणे | २२ | १६७ | ४९० | ३ |
| सापटणे | १९ | १९७ | ३९७ | १ |
| **एकूण** | **४१** | **३६४** | **८८७** | **४** |


# बागायत जमीन व बंगला विकणे आहे

मांगी येथील साडेसात एकर बागायत जमीन (तीन बोअर, एक विहिर, चार इंची तळ्यावरून पाईप लाईन) तसेच सर्व सुविधायुक्त असलेला बायपास रोडलगत हायवे टच असलेला दोन मजली बंगला योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे

✻ संपर्क ✻
मो.7709350035

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून घरपोच अंक मिळवा.!

# दुकान जागा भाड्याने देणे आहे

करमाळा शहरातील मेनरोडवरील फुलसौंदर चौकातील दुकान जागा (बेसमेंट गाळा - ६०० स्क्वे.फुट, दुकान गाळा - ६०० स्क्वे.फूट) भाड्याने देणे आहे.

संपर्क : मो.9422288777, 9405376378



प्रसिद्ध सिने अभिनेत्री
**माधुरी पवार**
यांचे हस्ते लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे.

**दि. 26 नोव्हेंबर 2024**
**संध्याकाळी 06: 00 वा.**

**स्थळ:** विकी मंगल कार्यालय

दिवाळी डबल धमाका चा
**कोण होणार भाग्यवान विजेता?**



**यश कलेक्शन**
मेनरोड, करमाळा

सर्व ग्राहकांचे
सहर्ष स्वागत करीत आहे
लकी ड्रॉ च्या अविस्मरणीय सोहळ्यात!

---

करमाळा शहरापासून २ ते ३ मिनीटाच्या अंतरावर आम्ही घेऊन येत आहोत..
**प्रशस्त व सुंदर अशा वातावरणाने सजलेला..**

# राम-नगर
पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर.

**कलेक्टर एन.ए. प्रकल्प**

पहिल्या १० ग्राहकांसाठी आकर्षक डिस्काउंट




**वैशिष्ट्ये...**
- अंडरग्राऊंड ड्रेनेज
- सुशोभित खेळण्यासह बगीचा
- लाईटची संपूर्ण व्यवस्था
- स्ट्रीट लाईट व्यवस्था
- प्रत्येक प्लॉट खांब दर्शवून त्याचे नंबर
- भव्य अशी स्वागत कमान
- जेथे आपले स्वप्नातील घर उभारू शकता.
- नियोजित डांबरी रस्ते
- नियोजित पाणी-पुरवठा लाईन

• भव्य **बंगलो ओपन प्लॉट**
२ ते ५.५० गुंठ्यापर्यंत उपलब्ध

बुकींग सुरू

कलेक्टर व टी.पी. च्या अंतिम मंजुरीसह प्लॉट उपलब्ध !
तरी लवकरात लवकर आपले प्लॉट बुकींग करा !

**संपर्क** सचिन(भाऊ) घोलप, ॲड.सुनील घोलप मो.9021313333 / 9921143662